फौ.कि.अर्ज क्र.३/२०२६
मॉडर्न एज्युकेशन सोसायटी/
महादेव जाधव
निशाणी क्र.१ लगत

**आदेशीका पुर्व पुरावा**

साक्षीदार क्र.२ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | |
|---|---|
| माझे नाव | – तानाजी लक्ष्मण चव्हाण |
| वडीलांचे नाव | – लक्ष्मण खेत्री चव्हाण |
| वय | – ६२ वर्षे |
| धंदा | – सेवानिवृत्त आणि शेती |
| राहणार | – य.पा.वाडी, ता. आटपाडी, जि. सांगली. |

**सरतपास वकील श्री. ए. डी. काळे यांचेमार्फत शपथेवर सुरु**

१. मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, आटपाडी हि संस्था सन १९७८ साली स्थापन झालेली आहे. सदर संस्थेमार्फत तालुक्यामध्ये पिंपरी, नेलकरंजी, घाणंद माडगूळ ४ हायस्कूल आहेत. सदर संस्थेचे ऑफिस ग.दि.मा. पार्क बाजार पटांगण जवळ आहे. सदर संस्थेमध्ये सन २०२२ पासून ते २०२७ पर्यंत कार्यकारी मंडळ कार्यरत आहेत. त्यामध्ये अध्यक्ष अजित तुकाराम चव्हाण म्हणून कार्यरत आहे.

२.          या संस्थेचे दोन संचालक मयत झाले होते. त्याठिकाणी दोन संचालकांची नियुक्ती करण्यासाठी दिनांक ०६/०४/२०२५ रोजी संस्था कार्यालयात मिटींग भरवली. सदर मिटींगमध्ये मयत यशवंत शंकर पत्की यांचे जागी रमेश रामचंद्र चव्हाण व मयत प्रदीप निवृत्ती विभूते यांचे जागी हणमंत दगडू चव्हाण यांची नियुक्ती झाली. सदर मिटींगमध्ये ठराव बहुमताने पास केला आणि बदल अर्ज दाखल करण्यासाठी अजित चव्हाण यांना अधिकार देण्यात आले. दरम्यानच्या काळात संस्थेचे मुख्य विश्वस्त महादेव विठोबा जाधव यांनी दिनांक १०/०४/२०२५ रोजीच्या सभेची नोटीस आम्हाला पाठवली. आम्ही सर्व संचालक मिटींगच्या वेळी कार्यालयात हजर राहिलो. ज्यांनी मिटींग बोलवली होती ते सभेला आले नाहीत. आम्ही थोडया वेळ वाट पाहून फोन केला, परंतू त्यांनी काही प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर आम्ही सर्व मुख्य विश्वस्त महादेव जाधव यांच्या घरी चुकीचे काही करु नका असे लेखी निवेदन गेण्यासाठी गेलो होतो. परंतू त्यांनी सदरचे निवेदन स्वीकारले नाही. त्यानंतर सदरचे निवेदन अध्यक्षांनी त्यांना पोस्टाने पाठविले. तरीदेखील त्यांनी दिनांक १०/०४/२०२५ रोजी मिटींग झाल्याचे दाखवून, बनावट रेकॉर्ड तयार करुन, खोटे लेटरपॅड वापरून बनावट कागदपत्रे तयार केले व धर्मादाय आयुक्त यांच्याकडे बदल अर्ज दाखल केला. आम्ही हजर झालेल्या ठिकाणी व्हीडीओ रेकॉर्डींग केले. सदर अर्ज दाखल केल्याची बाब अध्यक्षांना कळले त्यावेळी मुख्य विश्वस्त यांनी सर्व चुकीचे केले आहे असे म्हणून त्यांच्याविरुध्द पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. आटपाडी पोलिसांनी काही दखल घेतली नाही म्हणून अधिक्षक व उपअधिक्षक कार्यालय सांगली येथे तक्रार अर्ज दाखल केला परंतु अदयाप पोलिसांनी काही कारवाई केली नसल्यामुळे सदरचा फौजदारी खटला न्यायालयात दाखल केला आहे. मी सदर संस्थेमध्ये संचालक असल्यामुळे सदरचा सर्व प्रकार माझ्यासमक्ष घडलेला असल्यामुळे मला सर्व काही माहिती आहे. आरोपी यांनी प्रस्तुतचा गुन्हा करण्यासाठी खोटी कागदपत्रे, शिक्के, लेटर पॅड तयार करून संस्थेची फसवणूक

केलेली आहे. त्यामुळे, आरोपींवर कडक कारवाई करावी याकरीता सदरचा खटला दाखल केला आहे.

**सरतपास पूर्ण.**

---------------

साक्षीदाराची सही / अंगठा

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

आटपाडी.

दिनांक : ०२/०७/२०२६

(अ. जो. बाचुळकर)

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

आटपाडी

*****